सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यापीठ मार्ग, शिवाजीनगर, पुणे -४११०१६
दुरध्वनी : (०२०)५६५५९०७
ईमेल : principal.gppune@dtemaharashtra.gov.in
संकेतस्थळ : www.gppune.ac.in

जा.क्र. शातंनिपु/विवि/सूचना/२०२४/ ४८१६

दिनांक: 09 OCT 2024

सूचना

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता केंद्र शासनाच्या एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्यासाठी व त्यासाठी आवश्यक One Time Registration(OTR) बाबतच्या सूचना.

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, केंद्र शासनामार्फत प्रगती, सक्षम व स्वनाथ शिष्यवृत्ती योजना राबवली जात आहे. सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal (NSP) पोर्टलद्वारे www.scholarship.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. एनएसपी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी अर्ज(नवीन/नुतनीकरण) करण्याकरीता विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षाला नोंदणी करावी लागू नये व शिष्यवृत्ती अर्ज करण्याच्या प्रक्रियेत सुलभता येणेसाठी विद्यार्थ्यांना एनएसपी पोर्टलवर रजिस्ट्रेशन करून One Time Registration(OTR) क्रमांक प्राप्त करून घेणे अनिवार्य केले आहे. सदर OTR हा आधार क्रमांक /आधार नोंदणी आयडी (EID) च्या आधारे जारी केलेला एक युनिक नंबर(१४ अंकी क्रमांक)असून एनएसपी पोर्टलवर(NSP) विद्यार्थ्यांच्या संपूर्ण शैक्षणिक कारकीर्दीसाठी लागू राहाणार आहे. OTR क्रमांक प्राप्त करण्याबाबतच्या सर्व मार्गदर्शक सूचना, FAQ, युझर मॅन्यूअल एनएसपी पोर्टलवर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी एनएसपी पोर्टलवर कोणत्याही योजनेच्या लाभासाठी अर्ज(नवीन/नुतनीकरण) करण्याकरीता OTR क्रमांक प्राप्त करून घ्यावा. **अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ऑक्टोबर २०२४ पर्यंत आहे.** तसेच अधिक माहिती व अर्ज भरण्याच्या दिनांकामध्ये बदल यासाठी वरील संकेतस्थळावर अद्ययावत माहिती पाहणे आवश्यक आहे. तसेच सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४ मधील शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या पात्र विद्यार्थ्यांनी नुतनीकरण अर्ज (Renewal) अंतिम मुदतीच्या आत ऑनलाईन भरावेत.

एका शैक्षणिक वर्षात केंद्र शासनाच्या **NSP** पोर्टल व महाराष्ट्र शासनाच्या DBT पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभ घेता येईल.

प्रबंधक
शासकीय तंत्रनिकेतन पुणे

प्रत - १.सर्व विभाग प्रमुख,यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरील सूचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी व आपल्या विभागाच्या सुचना फलकावर लावण्यात यावी.

२. विभाग प्रमुख संगणक, यांना विनंती करण्यात येते की, संस्थेच्या संकेतस्थळावर कृपया प्रसिद्ध करण्यात यावी.

३. मुख्य सूचनाफलक

## एनएसपी पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांचे अर्ज भरण्यासाठी व OTR बाबत युझर मॅन्युअल, मार्गदर्शक सूचना व FAQ, चा वापर करुन,

**A. एनएसपी पोर्टलवर, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नवीन (Fresh) अर्ज करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी,**

१. विद्यार्थ्यांनी एनएसपी पोर्टलवर स्टुडंट कॉर्नर अंतर्गत उपलब्ध असलेली रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करुन प्राप्त होणारा **रेफरन्स नंबर ( ११ अंकी )** चा वापर करुन Face Authentication प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर **OTR** क्रमांक ( **१४ अंकी** ) प्राप्त होण्याकरीताची प्रक्रिया पूर्ण करावी. सदरची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर संबंधित विद्यार्थ्याला, विद्यार्थ्याच्या एनएसपी पोर्टलवर नोंदविलेल्या मोबाईलवर **OTR** क्रमांक एसएमएसद्वारे प्राप्त होणार आहे. (Face Authentication व **OTR** साठी Android based Mobile मध्ये Google Play Store द्वारे AadhaarFaceRD व NSP OTR App डाऊनलोड व इनस्टॉल करुन घ्यावी ).

२. तदनंतर, एनएसपी पोर्टलवर सुरु झालेल्या योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांनी लागू असलेल्या योजनांसाठी प्राप्त झालेल्या **OTR** द्वारे योजनेच्या लाभासाठीचा संपूर्ण अर्ज एनएसपी पोर्टलवर देण्यात आलेल्या अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत भरुन घ्यावा.

( **OTR** क्रमांक प्राप्तीसाठी आधार आवश्यक आहे. आधार क्रमांक नसल्यास आधार नोंदणीसाठी प्राप्त झालेला एनरोलमेंट आयडी (EID) वापरून नोंदणी करता येते.

जर एखाद्या अल्पवयीन विद्यार्थ्याला अद्याप आधार क्रमांक देण्यात आला नसेल तर त्याच्या/तिच्या पालक किंवा कायदेशीर पालकांच्या आधार क्रमांकाचा वापर करून नोंदणी केली जाऊ शकते.पोर्टलद्वारे प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक **OTR** क्रमांक प्राप्त होतो. तथापि, पालक/ कायदेशीर पालक जास्तीत जास्त दोन ओटीआर (दोन अल्पवयीन मुलांसाठी) क्रमांक तयार करू शकतात.

३. एखाद्या विद्यार्थ्याचे एकापेक्षा जास्त ओटीआर आढळल्यास तो शिष्यवृत्तीपासून वंचित राहू शकतो याची नोंद घ्यावी.

**B. एनएसपी पोर्टलवर, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नुतनीकरणाचे (Renewal ) अर्ज करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी,**

१. एनएसपी पोर्टलद्वारे Face Authentication ही सेवा शै. वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यात आली परंतु विद्यार्थ्यांना ती अनिवार्य करण्यात आली नव्हती. ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये, एनएसपी पोर्टलद्वारे Face Authentication ची प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्या विद्यार्थ्यांना, त्यांचा OTR **क्रमांक**, एनएसपी पोर्टलवरील नोंदणीकृत त्यांच्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे पाठविण्यात आला आहे. OTR **क्रमांक** प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांपैकी शै.वर्ष २०२४-२५ मध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी सदर OTR **क्रमांकाचा** वापर करुन संबंधित योजनेच्या लाभासाठीचा संपूर्ण अर्ज एनएसपी पोर्टलवर देण्यात आलेल्या अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत भरुन घ्यावा.

२. ज्या विद्यार्थ्याला **OTR क्रमांक**, एनएसपी पोर्टलवर विद्यार्थ्याच्या नोंदणीकृत मोबाईलवर, एसएमएस द्वारे **प्राप्त झालेला नसेल**, त्या विद्यारर्थ्याने सदर **OTR क्रमांक** एनएसपी पोर्टलवरील Know **your OTR** या सेवेचा वापर करुन प्राप्त करुन घ्यावा व त्या OTR **क्रमांकाचा** वापर करुन संबंधित

योजनेच्या लाभासाठीचा संपूर्ण अर्ज एनएसपी पोर्टलवर देण्यात आलेल्या अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत भरुन घ्यावा.

३. ज्या विद्यार्थ्यांनी शै. वर्ष २०२३-२४ मध्ये, एनएसपी पोर्टलद्वारे OTP based eKYC प्रक्रिया पूर्ण केली आहे, परंतु Face Authentication प्रक्रिया पूर्ण केलेली नाही त्या विद्यार्थ्यांना एनएसपी पोर्टलद्वारे Reference Number देण्यात आलेला आहे. त्या विद्यार्थ्यांपैकी, शै.वर्ष २०२४-२५ मध्ये शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग करुन एनएसपी पोर्टलद्वारे **Face Authentication** ची प्रक्रिया पूर्ण करुन, **OTR क्रमांक** प्राप्त करुन घ्यावे व सदर **OTR क्रमांकाचा** वापर करुन संबंधित योजनेच्या लाभासाठीचा संपूर्ण अर्ज एनएसपी पोर्टलवर देण्यात आलेल्या अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकाच्या आत भरुन घ्यावा.